* बुलडाणा नगर परिषद कार्यालय, बुलडाणा *
e-mail-mcbuldana@gmail.com ph.07262-242318

जावक क्रमांक/ मु.अ./५९०० /२०१६-१७
बुलडाणा नगर परिषद कार्यालय,बुलडाणा.
दिांक :- ०१ / ०३ /२०१७

## -: निवीदा सुचना :-

याव्दारे सर्व अधिकृत सनदी लेखापाल/प्रमाणित व्यवस्थापन लेखापाल ( CA/CMA ) हयांना याव्दारे कळविण्यात येते की, शासन निर्देशाप्रमाणे प्रणालीमध्ये दुहेरी नोंद लेखापध्दतीनुसार बुलडाणा नगर परिषदेच्या जमा-खर्चाच्या नोंदी (डाटाएन्ट्री ) व त्यासबंधीत इतर अनुषंगीक कामे पुर्ण करुन देण्यासाठी साठी बुलडाणा नगर परिषदेच्या व्दिनोंद लेखापध्दतीच्या अमंलबजावणीसाठी ई-गवर्नन्स प्रणालीनुसार लेखाकंन पध्दतीची अमंलबजावणीसाठी सन २०१७-१८ ते २०१९-२० या वित्तीय वर्षासाठी खाजगी सनदी लेखापाल/प्रमाणित व्यवस्थापन लेखापाल ( CA/CMA ) संस्थेची निश्चीती करावयाची आहे.

सदरील संस्थेची निवड ही २०१७-१८ ते २०१९-२० या आर्थीक वर्षाच्या कालावधीतील जमा खर्चाच्या नोंदी हया ई-गवर्नन्स या प्रणालीमध्ये घेण्याबाबतचे कामासाठी निवीदा मागविण्यात येत असुन सदरील काम करण्यास ईच्छुक व अनुभवी सनदी लेखापाल/प्रमाणित व्यवस्थापन लेखापाल ( CA/CMA ) हयांनी त्यांचे सदर कमासंबंधीची सिलबंद निवीदा दरवारी विहीत निवीदा प्रपत्रात रु. १०,०००/- अनामत रक्कमेंसह दिनांक २९ /03/२०१७ रोजी दुपारी -08:00-वाजेपावेतो शासनाचे www.-- mahatenders.gov.in---या वेबसाईटवर सदर कामासंबंधी वार्षीक दर नमुद करावेत.

मुख्याधिकारी,
नगर परिषद,बुलडाणा.

Scanned by CamScanner

नगर परिषद कार्यालय,बुलडाणा

-: निवीदा प्रपत्र :-

प्रपत्र क्र :- BOQ

बिनोंद लेखांकन पध्दत व ई-गवर्नन्स प्रणाली कार्यान्वीत करण्यासाठी खाजगी सनदी लेखापाल/प्रमाणित व्यवस्थापन लेखापाल ( CA/CMA ) संस्थेची नियुक्ती करणेबाबत निवीदादर पत्रक

(निवीदा इसारा रक्कम रु.१००००/-

| अ.क्र | कामाचा तपसिल | कामाची निवीदा दर |
|---|---|---|
| ०१ | शासन आदेश व निर्देश व नगर परिषद लेखासंहिता २०११ चे निर्देशान्वये सन २०१७-१८ ते २०१९-२० या आर्थीक वर्षातील खालीलप्रमाणे कामे पुर्ण करुन देण्याबाबत<br>१) शासनाचे परिपत्रकात नमुद टास्क ०१ ते ०४ मध्ये नमुद प्रमाणे कामे पुर्ण करणे.<br>२) जमा-खर्चाचे अचुक लेखासंकेतांक तयार करुन त्यास शासन निर्देशानुसार मान्यता प्राप्त करुन घेवुन त्यानुसार शासनाने विकसीत केलेले ई-गवर्नन्स प्रणालीमध्ये सन २०१७-१८ ते २०१९-२० हया आर्थीक वर्षातील दैनदिनीच्या जमा -खर्चाच्या नोंदी घेणे व त्यासंबंधीत विवरणपत्रे तयार करुन देणे.<br>३) तसेच सन २०१७-१८ चे नगर परिषदेने तयार केलेले संकल्पीत अंदाजपत्रक उक्त प्रणालीमध्ये मॅपींग करणे, तसेच सन २०१८-१९ ते २०१९-२० हया आर्थीक वर्षाचे संकल्पीत अंदाजपत्रक अचुकरित्या लेखासंकेतांकासह तयार करुन देणे<br>४) शासनाचे वेळोवेळी प्राप्त आदेशान्वये सदर प्रकरणी नगर परिषदेमार्फत वेळोवेळी बोलाविण्यात येणा-या सभेसे उपस्थित रहाणे.<br>५) उक्त प्रकरणी वेळोवेळी शासन निर्देशानुसार मागणी केल्याप्रमाणे माहिती /विवरणपत्रे उपलब्ध्द करुन देणे.इ. | येथे सन २०१७-१८ ते २०१९-२० या वर्षाकरिता वर्षनिहाय निवीदा दर वर्षनिहाय नमुद करावीत. |

दिनांक :-

निवीदाधारकांचे नांव व स्वाक्षरी
( सहीशिक्क्यानिशी )

सील

Scanned by CamScanner

## नगर परिषद कार्यालय,बुलडाणा

**व्दिनोंद लेखाकंना पध्दत ई-गवर्नन्स प्रणाली कार्यान्वीत करण्यासाठी खाजगी सनदी लेखापाल संस्थेची नियुक्ती संबंधीत सनदी लेखापाल हयांचे कामांचा अनुभव व इतर आवश्यक तांत्रीक पात्रता.**

| | | |
|---|---|---|
| ०१ | अनुभव/DEAS | महाराष्ट्र नगर परिषदा ,नगरपंचायती मध्ये Deas कामाचा अनुभव असणे आवश्यक आहे. |
| ०२ | Numbers of Partarners | ज्या सस्थेमध्ये जास्तीत जास्त भागीदार असतील CA/CMA पार्टनर असतील त्या संस्थेस प्राधान्य देण्यात येईल. |
| ०३ | Corporation Wing Experience | संस्थेला नगर पालिका/ महानगर पालिकेच्या कोणत्याही विभागातील लेखा व्दिनोंद लेखापध्दतीने करण्याचा अनुभव असणे आवश्यक आहे. |
| ०४ | Social Security Scheme Experience | संस्थेमध्ये Social Security Scheme मध्ये काम केल्याचा अनुभव असणे आणि त्याबाबत Order Copy जोडणे आवश्यक आहे. |
| ०५ | Deas Training | संस्थेचालकंना Deas Training in urban Devlopment Maharashtra चा अनुभव असणे आवश्यक आहे. |
| ०६ | Methodology & Approach | संस्थेला व्दिनोंद लेखापध्दत कामाची Methodology & Approach सादर करणे आवश्यक आहे. |
| ०७ | C & AG | CA संस्था C & AG empanelment (२०१६-१७) असणे व त्याबाबत प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. |

मुख्याधिकारी,
नगर परिषद,बुलडाणा.

Scanned by CamScanner

## नगर परिषद कार्यालय,बुलडाणा

## द्विनोंद लेखाकंन पध्दत व ई-गवर्नन्स प्रणाली कार्यान्वीत करण्यासाठी खाजगी सनदी लेखापाल/प्रमाणित व्यवस्थापन लेखापाल ( CA/CMA ) संस्थेची नियुक्ती संबंधीत सनदी लेखापाल हयांनी पाळावयाच्या अटी व शर्ती

१) संस्थेची निवड संबंधी कामाचा कंत्राट हा सन २०१७-१८ ते २०१९-२० हया वर्षापुरताच राहील.

२) शासन आदेश, निर्देश व मार्गदर्शन सुचनेनुसार लेखासंकेत (Deas code) तयार करणे, तयार केलेले लेखासंकेत तपासणे , दिनांक ०१/०४/२०१७ ची प्रारंभिक शिल्लक काढणे. सन २०१७-१८ ते २०१९-२० या कालावधीच्या द्विनोंद लेखाकंन पध्दतीनुसार ( शासनाने निश्चीत केलेल्या ई गवर्नन्स या प्रणालीमध्ये) दैनदिनी आर्थीक व्यवहाराच्या जमा खर्चाच्या नोंदी घेणे , त्यासंबधीत विवरणपत्रे तयार करणे, शासन परिपत्रकात नमुद टास्क ०१ ते ०४ मध्ये माहिती तयार करुन द्यावी लागेल.

३) नगर परिषद प्रशासन संचालनालयाचे परिपत्रक क्र. नपप्रंस/लेसुक/६१/ प्रक्र१४९/२००६ दिनांक ३१/०३/२००६ नुसार परिशिष्ठ ०३ मध्ये नमुद प्रमाणे चार टप्प्यात कामे करावी लागतील.

४) शासन आदेश,निर्देश व मार्गदर्शक सुचनेनुसार तसेच नगर परिषद लेखासंहिता-२०११ मध्ये दिलेल्या निर्देशानुसार जमा खर्चाचे अचुक लेखा संकेत तयार करुन त्यास शासनाची मान्यता घेणे. त्याच प्रमाणे सदर प्रणालीनुसार विवीध त्रैमासीक, अर्धवार्षीक, वार्षीक विवरणपत्र तयार करुन नगर परिषदेस आपले स्वाक्षरीनिशी पुरविणे.

५) निवीदा दर निर्धारीत केलेल्या निवीदा प्रपत्रात अनामत रकमेसह विहीत मुदतीत दोन लिफाफा पध्दतीनुसार व्दिप्रतीत सादर करावे लागतील.

६) निवीदा अनामत/इसारा रक्कम रु.१००००/-ही मुख्याधिकारी, नगर परिषद बुलडाणा हयाप्रमाणे नांव असलेली मुदतठेवी स्वरुपात किंवा सदर रक्कम ऑनलाईन नगर परिषदेचे स्टेट बँकशाखा बुलडाणा या बँकेचे खाते क्रमांक ११२५७९५९१४४- मध्ये ऑनलाईन स्वरुपात भरता येईल.

७) अनामत रकमेसह व न.प.ने निर्देशित केल्याप्रमाणे दोन लिफाफा पध्दतीनुसारच निवीदा सादर करावी लागेल. तसे न झाल्यास निवीदा दरवारी विधीग्राहय मानन्यात येणार नाही व अपात्र ठरविण्यात येईल.

८) निवीदा दोन लिफाफा पध्दतीनुसार सादर करण्यात यावी. लिफाफा क्र. ०१ हा तांत्रीक बोलीचा (पात्रतेचा) लिफाफा तर लिफाफा क्र. ०२ हा वित्तीय बोलीचा राहील.

०१) वार्षीक निवीदा दर संबंधीत माहिती ही सोबतचे विहीत निवीदा फॉर्ममध्ये नमुद करावेत.

-- ०२ --

Scanned by CamScanner

१८) मुळनिवीदा प्रपत्रात व व्दिप्रतीत निवीदा दरपत्रक सादर न केल्यास निवीदा दरपत्रक अपात्र ठरविण्यात येईल.

१९) देय बील नगर परिषदेच्या आर्थीक स्थितीनुसार अदा करण्यात येईल.

२०) यशस्वी निवीदाधारकास सदर कामाच्या शर्ती/अटी मान्य असल्याबाबत योग्य किंमतीच्या स्टँम्पपेपरवर स्वखर्चाने करारनामा करुन द्यावा लागेल.

२१) निवीदा काराने आयकर /सेवाकर कार्यालयाकडुन स्थायी लेखा क्रमांक घेतलेला असावा. अन्यथा तांत्रीक बोलीच्या लिफाप्यामधील कागदपत्रांच्या छाननीमध्ये निवीदाकारास अपत्रात्र ठरविण्यात येईल.

२२) यशस्वी निवीदाधारकास कामाच्या आदेशात नमुद प्रमाणे विहीत मुदतीत कामे पुर्ण करावी लागेल.

२३) सदरील निवीदेचे अनुषंगाने भविष्यात वेळोवेळी प्राप्त होणारे शासन आदेश, निर्देश व त्यानुषंगाने कार्यवाही करणे संस्थेस बंधनकारक राहील.

२४) कोणताही वाद हा बुलडाणा न्यायालयातंर्गत अनुज्ञेय राहील. ( **Only Buldana Juridicition** ) .

२५) तसेच सोबतचे विरणात नमुद प्रमाणे व्दिनोंद लेखाकंना पध्दत ई-गवर्नन्स प्रणाली कार्यान्वीत करण्यासाठी खाजगी सनदी लेखापाल संस्थेची नियुक्ती संबंधीत सनदी लेखापाल हयांचे कामांचा अनुभव व इतर आवश्यक तांत्रीक पात्रता.

मुख्याधिकारी,
नगर परिषद,बुलडाणा.

Scanned by CamScanner

९) तांत्रीक बोलीचा लिफाफा क्र.०१ हा नगर परिषदेकडे प्रत्यक्ष/डाकव्दारे विहीत मुदतीत जमा करण्यात यावा व त्यामध्ये खालीलप्रमाणे दस्ताऐवज असणे आवश्यक आहे.

०१) निवीदा अनामत/इसारा रक्कम रु.१००००/-ही मुख्याधिकारी, नगर परिषद बुलडाणा हयाप्रमाणे नाव असलेली मुदतठेवी स्वरुपात किंवा सदर रक्कम ऑनलाईन नगर परिषदेचे स्टेट बँकशाखा बुलडाणा या बँकेचे खाते क्रमांक ११२५७९५९१४४मध्ये ऑनलाईन स्वरुपात भरता येईल.

०२) तांत्रीक व आर्थिक क्षमता सिध्द करणारे कागदपत्रे,अनुभव व पात्रता समर्थनार्थे कागदपत्रे, फर्मचे नोंदणी व परवाने प्रमाणपत्र, संविदेमध्ये पदधिका-यांचा सहभाग नसल्याबाबत प्रमाणपत्र (परिशिष्ठ अ)

०३) आयकर/सेवाकर खात्याचे स्थायी लेखा क्रमांक कार्डाची छायाप्रत सोबत जोडावी.

१०) निवीदा दर सर्व करासंह (सेवाकर वगळुन ) व खर्चासह असावेत.

११) खालील परिस्थितीमध्ये निवीदा फेटाळण्यात /अपात्र ठरविण्यात येतील.

१) निवीदा संबंधीत अनामत रक्कम न भरल्यास
२) तांत्रीक बोलीचा लिफाफा क्र. ०१ मध्ये तंत्रीक पात्रतेसंबंधी कागदपत्रे सादर न केल्यास व सादर केलेल्या कागदपत्रामध्ये खरेपणा न आढळल्यास.
३) निवीदा सादर करतांना भ्रष्ट व कपट मार्गाचा वापर केल्याचे निदर्शनास आल्यास.
४) निवीदा प्रक्रियेमध्ये नगर परिषदेच्या निर्णयास प्रभाव पाडण्याचा प्रयत्न केल्यास.
५) सशर्त निवीदा सादर केल्यास.

१३) सदर कामाचे संविदेमध्ये बुलडाणा नगर परिषद पदाधिकारी/ नगर सेवकांचा प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष सहभाग- संबंध नसल्याचे विहीत परिशिष्ट -अ प्रमाणे प्रतिज्ञापत्र निवीदाधारकास करुन द्यावे लागेल व सदर प्रतिज्ञापत्र तांत्रीक बोलीचा लिफाफा .०१ मध्ये सादर करावा. असा सहभाग संबंध नंतर आढळल्यास संबंधीत निवीदाधारकाची निवीदा अपात्र ठरविण्यात येईल. व केलेल्या कामाबाबत देय रक्कम जप्त करण्यात येईल.

१४) कमी अथवा जास्त दराची निवीदा स्विकारणे अथवा नाकारणे तसेच कोणतीही अथवा प्राप्त सर्व निवीदा रदद करण्याचे अधिकार नगर परिषद प्रशासनाने स्वताकडे राखुन ठेवले आहे.

१५) सदरील नियुक्ती प्रकरण कोणत्याही स्थितीत निरस्वीकरण (Cancellation) रदद बंद करण्याचे अधिकार नगर परिषद प्रशासनाने स्वताकडे राखुन ठेवलेले आहे.

१६) देय बीलातून नियमानुसार शासकीय कर /सुरक्षाठेव रक्कम कपात करण्यात येतील.

१७) निवीदा भरणे संबंधी येणारा संपूर्ण खर्च हा पुर्णता निवीदा धारकास सोसावा लागेल.

.. ०३ ..

Scanned by CamScanner

# नगर परिषद कार्यालय,बुलडाणा

## परिशिष्ट - अ

## प्रतिज्ञापत्र

मी/आम्ही ........................................ याद्वारे असे नमुद करतो की, महाराष्ट्र नगर परिषद, नगर पंचायती व औद्योगीक नगरी अधिनियम १९६५ चे कलम १६ (१) (आय) व कलम ४४ (१) (ब) तरतुदीच्या , ज्या खाली उदधृत केलेल्या आहेत. माहिती आहे आणि गंभीरपणे नमुद करतो की, नगर पालिकेशी किंवा नगर पालिकेच्या अधिन किंवा नगर पालिकेने किंवा नगर पालिकेच्या वतीने करण्यात येणा-या संविदे मध्ये नगर परिषदेच्या कोणत्याही नगरसेवकाचा कोणताही हिस्सा हितसंबंध किंवा आमच्याशी भागीदारी नाही.

कलम १६ (१)(आय) :- यापूढे तरतूद केली असेल त्या व्यतीरिक्त , नगर पालिकेच्या आदेशावरुन केलेल्या कोणत्याही कामात किंवा नगर पालिकेशी किंवा नगर पालिकेच्या अधिन किंवा नगर पालिकेने किंवा नगर पालिकेच्या वतीने केलेल्या कोणत्याही संविदेत जिचा स्वताचा किंवा आपल्या भागीदारा मार्फत प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षरित्या कोणताही हिस्सा किंवा हितसंबंध असते.

कलम ४४ (१)(ब) :- पालिका सदस्य म्हणुन किंवा नगर पालिकेच्या कोणत्याही समितीचा सदस्य म्हणुन ज्या कोणत्याही बाबतीत कलम १६ चे पोटकलम (३), खंड(अ),(ब),
(क) ,(इ)व (ग) मध्ये वर्णन केल्या प्रमाणे त्याचा किंवा त्यांच्या भागीदाराचा प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष रितीने कोणताही हिस्सा किंवा हितसंबंध असेल मग अशा हिश्याची किंवा हितसंबंधाची किंमत काहीही असो किंवा ज्यात त्याचा अशीलाच्या, प्रकर्त्याच्या किंवा इतर व्यक्तीच्या वतीने व्यावसायीकदृष्टया त्याचा हिस्सा किंवा हितसंबंध असेल अशा कोणत्याही बाबतीत मतदान करील.

निवीदाधारकाचे नांव :- - - - - - - - - - - - - - - - -
पत्ता :- - - - - - - - - - - - - - - - - - - -
- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

निवीदाधारकाची स्वाक्षरी

दिनांक :-
साक्षीदाराचे नांव :- - - - - - - - - - - - -
पत्ता :- - - - - - - - - - - - - - - - - - - -
- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

साक्षीदाराची स्वाक्षरी

दिनांक :-

Signature Not Verified
Digitally signed by TULSHIDAS RAMABHAU BANASODE
Date: 2017.03.23 16:11:40 GMT+05:30
Location: Maharashtra

Scanned by CamScanner